**वादीं तर्फे सा.क्र.४ चा अतिरिक्त सरतपास – श्री. ए. एस. फराकटे वकील.**

**३.** आता मला मी टंकलिखित केलेले थळू कांबळे याचे वस्तू क्र. अ वरील मृत्यूपत्र दाखवले, त्यातील मजकूर थळू कांबळे याने सांगितल्या प्रमाणे बरोबर असून त्याला **नि. क्र.४७** देण्यात येतो.

**सरतपास पुर्ण.**

**प्रतिवादीं तर्फे उलट तपास – श्री. जे. जी. दिडबाग वकील.**

**४.** हे म्हणणे खरे नाही की, मी मागील चार वर्षांपासून अल्प प्रमाणात वकिली व्यवसाय करत आहे. मी थळू कांबळे याला पुर्वीपासून ओळखत नव्हतो. माझी व थळूची न्यायालयीन कामाकरीता भेट झाली नव्हती. माझी थळू कांबळे सोबत इतर कामासंदर्भाने देखील ओळख नव्हती. मी स्वतः टंकलेखनाचे काम करत नाही. मला नि. क्र.४७ वरील मृत्यूपत्र टंकलेखन करणा–या व्यक्तीचे नाव माझ्या शपथपत्रात नमूद करण्यास अडचण नव्हती.

**५.** मला मृत्यूपत्राची किती पाने होती ते आता आठवत नाही. मला त्यावरील साक्षीदारांची पुर्ण नावे सांगता येणार नाहीत. मी मृत्यूपत्राच्या पहिल्या पानाची सध्या आहे तशी प्रत काढली नव्हती. टंकलेखनाच्या चुकीमुळे मृत्यूपत्राच्या पहिल्या पानावरती प्रिंट तारीख १७.०४.२०२२ नमूद झाली आहे. मला सदर मृत्यूपत्राच्या पहिल्या पानावरील चलन प्रतीमध्ये दि.१७.०४.२०२२ व वेळ नमूद केल्याचे कारण सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर मृत्यूपत्र दि.१७.०४.२०२२ अथवा त्यापूर्वी थळू कांबळे व्यतिरिक्त अन्य इसमाने टंकलिखित केले आहे.

**६.** हे म्हणणे खरे नाही की, नि. क्र.४७ चे मृत्यूपत्र थळूच्या अपरोक्ष बोगस व खोटे बनवण्यात आले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी शपथपत्रामध्ये मृत्यूपत्रावरील साक्षीदारांबाबतचा मजकूर चुकीचा लिहिलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर मृत्यूपत्र मी तयार केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी वादीला मदत करण्यासाठी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण. फेरतपास नाही. श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

(आर. पी. थोरे)

दिनांक – २४.०६.२०२५. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.